आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८.३० वाजता

८ डिसेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिटचं उद्घाटन

- डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात देशात सुमारे २४ हजार कोटी रुपये परदेशी गुंतवणूक

- महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्ष पदी आमदार राहुल नार्वेकर यांची निवड बिनविरोध होणार

- राज्य विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात आतापर्यंत २८० सदस्यांचा शपथविधी / विरोधकांचा शपथविधीवरचा बहिष्कार मागे

**आणि**

- १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा ५९ धावांनी पराभव करून बांग्लादेशानं पटकावलं विजेतेपद

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या राजस्थानमध्ये जयपूर इथं आयोजित रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिट अर्थात गुंतवणूक शिखर परिषदेचं उद्घाटन होणार आहे. उद्घाटनानंतर प्रधानमंत्री या शिखर परिषदेला संबोधितही करणार आहे. राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्यासह केंद्र आणि राज्य सरकारचे अनेक मंत्रीदेखील या कार्यक्रमाला उपस्थित असतील.

ही शिखर परिषद तीन दिवस चालणार आहे. आहेत. उद्योग आणि व्यापार क्षेत्राचे पाच हजारांपेक्षा जास्त प्रतिनिधी, राजकीय दूत आणि गुंतवणूकदार या परिषदेत सहभागी होतील. परिषदेत सहभागी होणाऱ्यांमध्ये विविध ३२ देशांचे प्रतिनिधी असून, त्यापैकी १७ देश या परिषदेचे भागीदार देश आहेत.

या शिखर परिषदेला सुरुवात होण्याआधीच गुंतवणुकीशी संबंधित सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करारही केले गेले आहेत.

**<><><><><>**

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सुमारे २४ हजार कोटी रुपये परदेशी गुंतवणूक देशात आली आहे. गेले २ महिने  परदेशी गुंतवणूक दारांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेतली होती. मात्र त्या आधी सप्टेंबर २०२४मधे परदेशी गुंतवणुकीचा त्याआधीच्या ९ महिन्यातला उच्चांक गाठला गेला होता. या वर्षभरात आतापर्यंत परदेशी  गुंतवणूकदारांनी एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक डिबेंचर स्वरुपात केली आहे.

**<><><><><>**

सीमा सुरक्षादल गेली ६ दशकं देशाच्या सीमा सुरक्षेला मजबुती देण्याचं महत्त्वपूर्ण काम करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केलं. ते आज      जोधपूरमध्ये   सीमा सुरक्षा दलाच्या ६०व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. सीमा सुरक्षा दलाच्या योगदानाशिवाय देशासमोरच्या सुरक्षा आव्हानांना सामोरं जाणं अशक्य असल्याचंही ते म्हणाले.

जोधपूरमधल्या    सीमा सुरक्षा दलाच्या राजस्थान फ्रंटिरियर हेडक्वार्टरमध्ये पहिल्यांदाच संचलनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

संचलनात स्वदेशी हेलिकॉप्टर ध्रुव आणि एमआय१७ देखील सहभागी झाली आहेत. यासोबतच श्वानपथकही या कार्यक्रमात सहभागी झालं असून या कार्यक्रमात ७ सैनिकांना शौर्य पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

या कार्यक्रमाचा आकाशवाणी वृत्तांत आज रात्री ८ वाजता प्रसारित झाला. आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन रोज रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र आता आपण ऐकत आहात.

**<><><><><>**

भगवद्गीता हा ग्रंथ पूर्ण जगाला मार्गदर्शक ठरत असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. हरयाणात कुरुक्षेत्र इथं गीता ज्ञान संस्थेने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय गीतामहोत्सवाला ते संबोधित करत होते. गेल्या १० वर्षात भारताने अभूतपूर्व प्रगती केली असून विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अर्जुनाचा निर्धार अंगी बाणवला पाहिजे असं ते म्हणाले.

**<><><><><>**

येत्या काळात भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीनं आखाती तसंच भूमध्य प्रदेशाची भूमिका महत्वाची असणार आहे असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते बहरीन इथं झालेल्या मनामा डायलॉगला संबोधित करत होते. हरीत हायड्रोजन आणि हरीत अमोनिया सारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये आखाती तसंच भूमध्य प्रदेशांची भूमिका महत्वाची असेल असं ते म्हणाले. यावेळी जयशंकर यांनी पश्चिम आशियायी प्रदेशाबाबतच्या भारताच्या सर्वसमावेशक धोरणाबाबत आपल्या संबोधतानून

सांगितलं, तसंच भारताच्या आर्थिक आणि सामरिक हितसंबंधांसाठी या क्षेत्राचं महत्त्वही अधोरेखित केलं.

आखाती आणि भमध्य प्रदेशात स्थायिक झालेले भारतीय नागरिक भारत आणि पश्चिम आशियायी देशांना जोडणारा दुवा आहेत. ते द्विपक्षीय संबंध आणि आर्थिक विकासात महत्त्वाचं योगदान देत आले आहेत, असं जयशंकर यांनी यावेळी नमूद केलं.

**<><><><><>**

सीरियातील दमास्कस इथलं भारतीय दूतावास अजूनही कार्यरत असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. दमास्कस इथलं भारताचं दूतावास तिथल्या सर्व भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी उपलब्ध आहे, ते भारतीय नागरिकांच्या संपर्कात असून, सर्व नागरिक सुरक्षित आहेत, असंही परराष्ट्र मंत्रालयानं कळवलं आहे.  दूतावास उपलब्ध आहे.

**<><><><><>**

बांगलादेशाच्या भारताबरोबरच्या व्यापारात आलेल्या मंदीवर लवकरच तोडगा निघण्याची शक्यता असल्याचं बांगलादेशाचे परराष्ट्र व्यवहार सल्लागार मोहम्मद तौहीद हुसेन यांनी म्हटलं आहे. अशी  बातमी स्थानिक वृत्त संस्थेनं दिली आहे. व्यापार मंदीची समस्या सौहार्दपुर्णतेनं सोडवली जाईल , असंही हुसेन यांनी सांगितलं. दोन्ही देशांदरम्यानच्या व्यापारात गेल्या २-३ महिन्यात बरीच घाट झाली आहे. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्रि  उद्या बांगलादेशात येणार असून त्यांच्याबरोबर द्विपक्षीय व्यापार आणि परस्पर चिंतेच्या विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे, असं हुसेन म्हणाले.

<><><><>

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी तात्पुरते अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी १०६ नवनिर्वाचित आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिली. काल १७३ नवनिर्वाचित आमदारांनी शपथ घेतली होती. महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या वापराला निषेध म्हणून काल शपथ घ्यायला नकार दिला होता. आज अधिवेशनाचं कामकाज सुरु होण्याआधी महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली, त्यात बहिष्कार मागे घेऊन सदस्यत्वाची शपथ घेण्याचा निर्णय झाला.

शपथविधीनंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. दरम्यान सत्ताधारी महायुतीच्या सदस्यांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा विरोध करणाऱ्या महाविकास आघाडीचा निषेध केला.

निवडणुकीतल्या अपयशाचं खापर मतदानयंत्रावर फोडण्याची विरोधकांची कृती लोकशाहीला अपायकारक असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

<><><><>

राज्य विधानसभेच्या अध्यक्ष पदावर आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आज दुपारी नार्वेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला होता. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार,

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. विधानसभा अध्यक्षपदासाठी आज दुपारी बारा वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती. मात्र, अन्य कोणाचाही अर्ज दाखल न झाल्यानं नार्वेकर यांची निवड बिनविरोध होत आहे.

**<><><><><>**

मतपत्रिकेवर मतदान घेण्यावरून चर्चेत आलेल्या सोलापूर जिल्ह्यातल्या मारकडवाडी गावाला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. लोकशाही टिकविण्यासाठी ईव्हीएम मशीन नको ही चळवळ अधिक तीव्र करण्याची गरज आहे, असं ते म्हणाले.

मारकडवाडी इथल्या ईव्हीएम यंत्रात बिघाड झालेला असू शकतो, मात्र सर्वच ईव्हीएम खराब आहेत, असा याचा अर्थ होत नाही. गावकऱ्यांच्या या संदर्भातल्या शंका निवडणूक आयोगानं दूर करायला हव्यात, असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नाशिकमध्ये मांडलं. विरोधकांना कमी मतं का मिळाली याबद्दल त्यांनी आत्मपरीक्षण करावं, याचं खापर ईव्हीएमवर फोडू नये, असंही आठवले यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं होणाऱ्या महा कुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या १३ डिसेंबर रोजी प्रयागराजला भेट देणार आहेत. त्यादृष्टीनं तसंच कुंभ मेळ्याच्या तयारीच्या दृष्टीनं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज विविध कामांचा आढावा घेतला. कुंभमेळ्याच्या दृष्टीन सुमारे ५ हजार कोटी रुपये खर्चाची विविध विकास कामं करण्यात येत आहेत.

**<><><><><>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आज रशियाच्या तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. आपल्या रशिया भेटीत राजनाथ सिंह येत्या मंगळवारी मॉस्को इथं भारत-रशिया आंतर सरकारी लष्करी तसंच लष्करी तंत्रज्ञानविषयक सहकार्य आयोगाच्या २१ व्या बैठकीत सहभागी होतील. राजनाथ सिंह यांच्यासह रशियाचे संरक्षणमंत्री आंद्रे बेलूसोव्ह हे या बैठकीचं सहअध्यक्ष भुषवणार आहे.

या बैठकीत दोन्ही नेते संरक्षण क्षेत्रातील परस्पर संबंधांचा आढावा घेतील, यासोबतच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण करतील.

**<><><><><>**

दुबई इथं झालेल्या १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा ५९ धावांनी पराभव करून बांग्लादेशानं विजेतेपद पटकावलं. विजेतेपदासाठी आज झालेल्या अंतिम सामन्यात बांग्लादेशानं भारतासमोर विजयासाठी १९९ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र बांग्लादेशाच्या गोलंदाजीसमोर भारताचा संपूर्ण संघ ३५ षटकं आणि दोन चेंडूत केवळ १३९ धावा करून तंबूत परतला.

भारताच्या वतीनं कर्णधार मोहम्मद आमन यानं सर्वाधिक २६ धावा केल्या. अंतिम सामन्यात भारताचे ३ तर संपूर्ण स्पर्धेत एकूण १० गडी बाद केलेल्या बांग्लादेशाचा गोलंदाज इक्बाल इमन याला सामनावीर तसंच मालिकावीराचा पुरस्कार देऊन गौरवलं गेलं.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला क्रिकेट संघांमध्ये आज ब्रिस्बेन इथं झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर १२२ धावांनी विजय मिळवला. या विजयासोबत ऑस्ट्रेलियानं तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यानंतर जॉर्जिया आणि एलिसे यांच्या शतकी खेळींच्या जोरावर निर्धारीत ५० षटकांत ८ बाद ३७१ धावा केल्या. विजयासाठी ३७२ धावांचा पाठलाग करताना भारताचा संपूर्ण संघ ४४ षटकं आणि ५ चेंडूंमध्ये २४९ धावा करून माघारी परतला. भारताच्या वतीनं सलामीला आलेल्या ऋचा घोष हीनं सर्वाधिक ५४ धावा केल्या, तर ऑस्ट्रेलियाच्या ॲनाबेल हीनं भारताच्या चार खेळाडूंना बाद केलं.

मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना येत्या ११ डिसेंबरला पर्थ इथं होणार आहे.

//<><><><><>//